नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 05/05/2021 (बुधवार)
(सायंकाळ)

---

### अवैध गावठी मोहाफुल दारू अड्ड्यात धाड
### पोलिस स्टेशन पारशिवनी ची कार्यवाही

पो.स्टे. पारशिवनी :– दिनांक 04/05/21 चे 15.10 वा ते 16.00 वा. दरम्यान पोलिस स्टेशन पारशिवनी येथील पोलिस स्टाफला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे स्टाफने मौजा बच्छेरा टोली ता. पारशिवनी शेत शिवार येथे आरोपीतांच्या मोहाफुल दारू गाळण्याची रनिंग भट्टीवर छापा घातला असता आरोपी नामे– 1. रमेश शालीकराम कोरचे वय 38 वर्ष, रा. बनेरा टोली ता.पारशिवनी, 2. रविन्द्र फजितराव मडावी वय 21 वर्ष, रा. बनेरा टोली ता. पारशिवनी हे दोघेही अवैधरित्या मोहाफुल दारू गाळतांना मिळुन आले. आरोपीतांचे ताब्यातुन तसेच हातभट्टीच्या ठिकाणाहुन 110 लिटर मोहाफुल दारू की 55,000/–रू, 300 लिटर मोहाफुल सडवा कि. 60,000/–रू. व दारू गाळण्याचे साहित्य कि. 3,000/–रू. असा एकुण कि. 1,18,000/–रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे पोउपनि संदीपान उबाळे पो स्टे पारशिवनी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 65 (इ)(एफ)(सी), 83 महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक रवि बर्वे 8030565076 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अप्पर पोलीस अधिक्षक श्री. राहुल माकणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. संतोष वैरागडे, पोलीस उपनिरीक्षक श्री. पोउपनि संदीपान उबाळे, पोना संदीप कडु, पोशि महेन्द्र जळीतकर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर